# भूमि अभिलेख विभाग

## सरळसेवा भरती -२०२१

## गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक)

## निवडयादीमधील उमेदवारांकरीता जिल्हा पसंतीक्रम सादर करण्याच्या अनुषंगाने सर्वसाधारण सुचना

- भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ संवर्गातील पदभरतीकामी माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये आयोजित ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या आधारे उमेदवारांची कागदपत्रे पडताळणीचे काम पुर्ण करण्यात येवून प्रवर्गनिहाय निवडयादी व प्रतिक्षायादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
- निवडयादीमधील उमेदवारांना संबंधीत उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडून जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून वैद्यकीय तपासणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याकामी कळविणेत आलेले आहे. त्यानुसार बहुतांश उमेदवारांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केलेले आहे.
- ज्या उमेदवारांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केलेले आहे त्या उमेदवारांना पदस्थापना देण्याकामी उमेदवारांकडून जिल्हा पसंतीक्रम घेण्याचा विभागाकडून निर्णय घेण्यात आला आहे.
- त्यानुसार राज्यातील विभागनिहाय गट क पदसमुह ४ संवर्गातील पदभरतीकामी उपलब्ध पदांचा जिल्हानिहाय तपशील संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेला आहे.
- सदरची पदे ही त्या त्या विभागातील उपलब्ध कर्मचारी व कामाचा व्याप तसेच प्रशासकीय निकड लक्षात घेवून निश्चीत करण्यात आलेली आहेत.
- उमेदवाराने ज्या विभागाकरीता अर्ज दाखल केलेला आहे त्या विभागातील रिक्त पदांच्या माहितीचे व्यवस्थित अवलोकन त्यांचे पदस्थापनेकामी जिल्हा पसंतीक्रम नोंदवावेत.
- उमेदवाराने पसंतीक्रम **दि. २५/६/२०२३ रोजी संध्याकाळी ६.०० वा. पुर्वी** त्या त्या विभागाकडून विहीत केलेल्या ई-मेल पत्यावर अथवा संबंधीत उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) समक्ष सादर करावेत.
- पसंतीक्रम सादर करण्याकामी विभागनिहाय ई-मेल, पत्ता संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेला आहे.
- पसंतीक्रम ई-मेल व्यतिरीक्त इतर माध्यमाद्वारे (पोस्ट/कुरीयर/समक्ष) सादर करण्यात येणार असल्यास बंद लिफाफ्यामध्ये सादर करावा. व लिफाफ्यावर "**सरळसेवा भरती-२०२१, पदस्थापनेकामी पसंतीक्रम**" असे सुस्पष्ट अक्षरात लिहीलेले असावे.

- ज्या उमेदवारांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांचे पसंतीक्रमाबाबतचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- उमेदवाराने जिल्हा पसंतीक्रम नोंदविताना उमेदवाराने पदभरतीकामी ज्या विभागातून अर्ज दाखल केलेला आहे त्याच विभागातील सर्व जिल्ह्यांचा पसंतीक्रमामध्ये समावेश करावा.
- पसंतीक्रमामध्ये केवळ जिल्ह्यांचा उल्लेख करावा. कोणत्याही परिस्थिती कार्यालयाचा उल्लेख पसंतीक्रमामध्ये करण्यात येवू नये. उमेदवाराने पसंतीक्रमामध्ये कार्यालयाचा उल्लेख केलेला असल्यास त्याचा पसंतीक्रम प्राप्त झाला नाही असे समजून प्रशासकीय निकड लक्षात घेवून पदस्थापना देण्यात येईल.
- पसंतीक्रमाबाबत अर्जामध्ये उमेदवाराने त्याचे स्वग्राम नोंदविणे आवश्यक आहे. सदर स्वग्राम हे संबंधीत उमेदवाराच्या सेवाभिलेखामध्ये नोंदविण्यात येईल.
- पदस्थापना देताना दिव्यांग उमेदवारांना सर्व प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराने ज्या क्रमाने जिल्हा पसंतीक्रम नोंदविला आहे त्या क्रमाने सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधील त्याच्या गुणानुक्रमानुसार पदस्थापना देण्याकामी विचार करण्यात येईल.
- उमेदवाराने पसंतीक्रमामध्ये सर्व जिल्ह्यांचा समावेश केलेला नसल्यास व गुणानुक्रमानुसार सदर उमेदवाराला पसंती नोंदविलेल्या जिल्ह्यांमध्ये पदस्थापना देणे शक्य न झाल्यास अशा उमेदवाराला सर्व उमेदवारांना पसंतीक्रमानुसार पदस्थापना दिल्यानंतर शिल्लक पदांवर प्रशासकीय निकड लक्षात घेवून पदस्थापना देण्यात येईल. व त्याबाबत उमेदवारांना कोणतीही तक्रार करता येणार नाही.
- जे उमेदवार दिलेल्या वेळेत पसंतीक्रम सादर करणार नाहीत त्यांना प्रशासकीय निकड लक्षात घेवून पदस्थापना देण्यात येईल.
- पसंतीक्रम नोंदविण्यापुर्वी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या उपलब्ध पदांच्या माहितीचे व्यवस्थित अवलोकन करुन पसंतीक्रम नोंदवावेत. उमेदवाराने सर्वात आधी सादर केलेला पसंतीक्रम ग्राह्य धरण्यात येणार असल्यामुळे काळजीपुर्वक पसंतीक्रम नोंदवावेत. एकदा नोंदविलेल्या पसंतीक्रमामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये बदल करता येणार नाही.
- या सोबत जाहीर केलेल्या ई-मेल व्यतिरीक्त इतर ई-मेल द्वारा प्राप्त पसंतीक्रम अर्जांचा तसेच **दि.२५/०६/२०२३ नंतर प्राप्त पसंतीक्रम अर्जांचा विचार केला जाणार नाही.**
- उमेदवारांनी सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या आधारे गुणानुक्रमानुसार संबंधीत उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयाकडून माहे जुन, २०२३ अखेर पदस्थापना देण्यात येणार आहे.
- पदस्थापना आदेशामध्ये बदल करण्याकामी कोणत्याही अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

महाराष्ट्र शासन
भूमि अभिलेख विभाग
सरळसेवा भरती - २०२१

---

पदस्थापने कामी पसंतीक्रम

प्रति,
उपसंचालक भूमि अभिलेख
_____ _प्रदेश, _____,

विषय - सरळसेवा भरती २०२१, पदस्थापनेकामी पसंतीक्रम नोंदविणेबाबत.

विभाग -
उमेदवाराचे नाव -
स्वग्राम -
मोबाईल क्र. -
ई-मेल -
सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील अ.क्र. -
ऑनलाईन परिक्षेत प्राप्त एकूण गुण -
ज्या प्रवर्गातून निवड झाली आहे तो प्रवर्ग -
(जात प्रवर्ग व समांतर आरक्षण )
पदस्थापनेकामी जिल्हा पसंती क्रम - १)
२)
३)
४)
५)
६)
७)
८)

संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली पदभरती कामी उपलब्ध पदांची माहिती मी पाहिली असून सदर माहितीचे व्यवस्थीत अवलोकन करुन मी वरील पसंतीक्रम नोंदविलेले आहेत.

दिनांक - /०६/२०२३ (उमेदवाराची स्वाक्षरी व नाव)

सरळसेवा भरती- २०२१

पदस्थापनेबाबत जिल्हा पसंतीक्रम सादर करण्याकामी संपर्काकरीता विभाग निहाय माहिती.

१) पुणे विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे
१ ला मजला, नविन प्रशासकीय इमारत, विधानभवनासमोर,
पुणे - ४११ ००१.
दुरध्वनी क्र.- ०२०- २६०५००२९.
ई-मेल - **saralsevabharati2021.ddlrpune@gmail.com**

२) कोकण (मुंबई) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई,
डी.डी. बिल्डींग, १ ला मजला, जुने जकात घर,
शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी क्र.- ०२२- २२६६०६५२, २२७०१७३८.
ई-मेल - **ddlrmumbai@gmail.com**

३) नाशिक विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश,नाशिक,
जुने सि.बी.एस. जवळ, शरणपुर रोड,
नाशिक - ४२२ ००२
दुरध्वनी क्र.- ०२५३-२५७८०१५ .
ई-मेल - **ddlrnashik.2023@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| ४) औरंगाबाद विभाग | - | उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद,<br>दमडी महल, पंचायत समितीच्या बाजूला,<br>औरंगाबाद - ४३१ ००१<br>दुरध्वनी क्र. ०२४०-२३५३४६१, २३४४८७७.<br>ई-मेल - **ddlrabdssb21@gmail.com** |
| ५) अमरावती विभाग | - | उपसंचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती,<br>विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, कँप,<br>अमरावती - ४४४ ६०२<br>दुरध्वनी क्र.-०७२१-२६६२७४७.<br>ई - मेल- reqddlramt@gmail.com |
| ६) नागपुर विभाग | - | उपसंचालक भूमि अभिलेख, नागपुर प्रदेश, नागपुर,<br>जुने सचिवालय ईमारत, खोली क्र. १७, २८,<br>सिव्हील लाईन्स, नागपुर- ४४० ००१<br>दुरध्वनी क्र.- ०७१२-२५६०२७२, २५३३३६८.<br>ई - मेल- nagpurbharti2021@gmail.com |

गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक टंकलेखक) संवर्गातील पदभरती कामी
जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा तक्ता - पुणे विभाग

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पदभरती कामी उपलब्ध पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | पुणे | ५३ | |
| २ | सातारा | ६१ | |
| ३ | सांगली | ५३ | |
| ४ | कोल्हापुर | ३८ | |
| ५ | सोलापुर | ४७ | |
| | एकूण पुणे विभाग | २५२ | |

स्वा. /- xxx
(अनिल माने)
उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे

गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक टंकलेखक) संवर्गातील पदभरती कामी जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा तक्ता - कोकण (मुंबई) विभाग

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पदभरती कामी उपलब्ध पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर व उपनगर | २६ | |
| २ | ठाणे | २५ | |
| ३ | पालघर | ३४ | |
| ४ | रायगड | ६१ | |
| ५ | रत्नागिरी | ४९ | |
| ६ | सिंधुदूर्ग | ३५ | |
| | एकूण कोकण (मुंबई) विभाग | २३० | |

स्वा./- xxx
(जयंत निकम)
उपसंचालक भूमि अभिलेख,
कोकण प्रदेश, मुंबई.

गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक टंकलेखक) संवर्गातील पदभरती कामी

जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा तक्ता - नाशिक विभाग

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पदभरती कामी उपलब्ध पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | ५८ | |
| २ | नाशिक | ४४ | |
| ३ | धुळे | ८ | |
| ४ | नंदुरबार | ८ | |
| ५ | जळगांव | २९ | |
| | एकूण नाशिक विभाग | १४७ | |

स्वा. /- xxx
(विलास शिरोळकर)
उपसंचालक भूमि अभिलेख
नाशिक प्रदेश, नाशिक

गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक टंकलेखक) संवर्गातील पदभरती कामी जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा तक्ता - औरंगाबाद विभाग

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पदभरती कामी उपलब्ध पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | २१ | |
| २ | जालना | २३ | |
| ३ | परभणी | २१ | |
| ४ | हिंगोली | १३ | |
| ५ | नांदेड | ४० | |
| ६ | लातुर | २१ | |
| ७ | उस्मानाबाद | २३ | |
| ८ | बीड | ३७ | |
| | एकूण औरंगाबाद विभाग | १९९ | |

स्वा -/.xxx
(सुनिल धोंगडे)
उपसंचालक भूमि अभिलेख,
औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद.

गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक टंकलेखक) संवर्गातील पदभरती कामी जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा तक्ता - अमरावती विभाग

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पदभरती कामी उपलब्ध पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अमरावती | ३७ | |
| २ | बुलढाणा | ३४ | |
| ३ | यवतमाळ | ३५ | |
| ४ | अकोला | १३ | |
| ५ | वाशिम | ९ | |
| | एकूण अमरावती विभाग | १२८ | |

स्वा -/.xxx

**( डॉ. लालसिंग मिसाळ )**
**उपसंचालक भूमि अभिलेख,**
**अमरावती प्रदेश, अमरावती**

गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक टंकलेखक) संवर्गातील पदभरती कामी
जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा तक्ता - नागपुर विभाग

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पदभरती कामी उपलब्ध पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | नागपुर | ४० | |
| २ | वर्धा | २१ | |
| ३ | भंडारा | २० | |
| ४ | गोंदिया | २१ | |
| ५ | चंद्रपुर | ४१ | |
| ६ | गडचिरोली | २७ | |
| | एकूण नागपुर विभाग | १७० | |

स्वा./- xxx
(विष्णू शिंदे)
उपसंचालक भूमि अभिलेख,
नागपुर प्रदेश, नागपुर.